# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:21.07.2025** **वार:सोमवार**

---

१) संसदेचं आजपासून पावसाळी अधिवेशन

२) पंतप्रधान बुधवारपासून युनायटेड किंग्डम आणि मालदीवच्या दौऱ्यावर

३) भारत जलद आर्थिक व्यवहारांमध्ये जगात आघाडीवर असल्याची आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची पुस्ती

४) विद्यमान आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताची इलेक्ट्रॉनिक्स निर्यात ४७ टक्क्यांनी वाढली आणि

५) बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत, कोनेरू हम्पी उपांत्य फेरीत दाखल

**<u>संसदअधिवेशन</u>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात होणार आहे. या अधिवेशनाचा कालावधी येत्या २१ ऑगस्टपर्यंत निश्चित करण्यात आला आहे. दोन्ही सभागृहांच्या २१ बैठका होतील. जनविश्वास सुधारणा विधेयक २०२५, राष्ट्रीय क्रीडा प्रशासन विधेयक २०२५ या अधिवेशनात सभागृहात चर्चेला येण्याची शक्यता आहे. संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने काल नवी दिल्लीत संसद भवनात सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. या बैठकीला केंद्रीय मंत्री आणि राज्यसभेतले नेते जे पी नड्डा, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि डॉ एल मुरूगन उपस्थित होते. त्याचबरोबर काँग्रेसचे गौरव गोगोई, प्रमोद तिवारी, समाजवादी पक्षाचे रामगोपाल यादव, द्रमुकचे तिरुची सिवा आणि टी आर बालु, आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे उपस्थित होत्या.

दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांशी समन्वय साधून काम करावं, असं आवाहन केंद्र सरकारनं या बैठकीत केलं. याबाबत वार्ताहरांशी बोलताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले –

**<u>बाईट – किरेन रीजीजू</u>**

अधिवेशनात पंतप्रधानांनी संसदेत महत्त्वाच्या विषयांवर निवेदन द्यावं, अशी मागणी काँग्रेस पक्षाने या बैठकीत केल्याची माहिती गौरव गोगोई यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिली. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाच विमानं पाडली गेल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला आहे. त्यावर

आणि पहलगाममध्ये सुरक्षेतील त्रुटीवर बोलावं, अशी मागणी काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी सरकारला केली आहे.

**पंतप्रधान-- दोन देशांचा दौरा--NOA-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवारपासून युनायटेड किंग्डम आणि मालदीवच्या दौऱ्यावर जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात, पंतप्रधान या महिन्याच्या २३ तारखेला दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी ब्रिटनला जातील. या दौऱ्यादरम्यान, पंतप्रधान मोदी ब्रिटनचे पंतप्रधान केयर स्टारमर यांच्याशी भारत-युके द्विपक्षीय संबंधांच्या संपूर्ण पैलूंवर विस्तृत चर्चा करतील. राजे चार्ल्स तिसरे यांचीही मोदी भेट घेण्याची अपेक्षा आहे. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, पंतप्रधान मोदी या महिन्याच्या २५ तारखेपासून दोन दिवसांच्या मालदीवच्या दौऱ्यावर जातील. मालदीवच्या स्वातंत्र्याच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात ते 'सन्माननीय पाहुणे' असतील.

**अमित शाह--NOA-**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हिमाचल प्रदेशातील नैसर्गिक आपत्तींची वारंवारता आणि तीव्रता लक्षात घेता बहु-क्षेत्रीय केंद्रीय पथक स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय पथकात राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, रुडकीची केंद्रीय इमारत संशोधन संस्था, पुण्याची भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र संस्था आणि इंदूरची भारतीय तंत्रज्ञान संस्था यातील तज्ज्ञांचा समावेश असेल. यावर्षी नैऋत्य मान्सूनमध्ये हिमाचल प्रदेशच्या विविध भागात पूर, अचानक पूर आणि भूस्खलनाच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारनं नुकसानाचं प्रत्यक्ष मूल्यांकन करण्यासाठी आधीच एक आंतर-मंत्रालयीन केंद्रीय पथक तैनात केलं आहे.

**अंमलीपदार्थमुक्तयुवक-NOA- योगेश**

विकसित भारतासाठी अंमली पदार्थ युवक ही देशव्यापी मोहीम राबवण्याबाबतचं घोषणापत्र काल केंद्रीय युवा व्यवहार मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी जाहीर केलं.ते काल वाराणसी इथं आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय युवा अध्यात्मिक शिखर परिषदेच्या समारोप कार्यक्रमात बोलत होते. विकसित भारताच्या उभारणीसाठी युवकांची भूमिका महत्त्वाची आहे यावर त्यांनी भर दिला.

**वॉका-REV. IMF – UPI**

**इंट्रो-**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं, भारत जलद आर्थिक व्यवहारांमध्ये जगात आघाडीवर असल्याचं म्हटलं आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत...

**स्क्रीप्ट-**

UPI म्हणजे युनिफाइड पेमेंट्स इंटरफेसने यावर्षी जूनमध्ये २४ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचे १८ अब्ज व्यवहार नोंदवले आहेत.  किरकोळ डिजिटल व्यवहारांच्या वाढीबाबत IMFनं प्रकाशित केलेल्या

टिपेनुसार, UPI मुळं भारतातील आर्थिक व्यवहार परिसंस्थेमध्ये क्रांती घडवून आणली आहे. यामुळे दोन व्यक्तिंदरम्यानचे व्यवहार सोपे झाले, तसंच लाखो लहान व्यवसायिक कमीत कमी खर्चात डिजिटल पेमेंट स्वीकारण्यास सक्षम झाले आहेत. सरकारी आकडेवारीनुसार, UPI आता दरमहा १८ अब्जाहून अधिक व्यवहारांवर प्रक्रिया करते, ही रक्कम भारताच्या एकंदर डिजिटल व्यवहाराच्या ८५ टक्के आहे. ४९१ दशलक्ष वापरकर्ते आणि ६५ दशलक्ष व्यापाऱ्यांसह, UPI मध्ये एकाच डिजिटल चौकटीद्वारे ६७५ बँका जोडल्या आहेत. लाखो व्यक्ती आणि लघु व्यवसाय आता सुरक्षित आणि कमी खर्चिक व्यवहारांसाठी UPI वर अवलंबून आहेत. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर पुणे.

**<u>इलेक्ट्रॉनिक्स</u>**

विद्यमान आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत भारताची इलेक्ट्रॉनिक्स निर्यात ४७ टक्क्यांनी वाढून १२ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त झाली आहे. जागतिक उत्पादन केंद्र म्हणून देशाच्या वाढीचा हा संकेत आहे. वाणिज्य मंत्रालयाच्या मते, एप्रिल-जून तिमाहीत भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रासाठी अमेरिका, युएई आणि चीन हे तीन प्रमुख निर्यात ठिकाणं म्हणून उदयास आले आहेत. देशाच्या इलेक्ट्रॉनिक निर्यातीसाठी नेदरलँड्स आणि जर्मनी हे इतर प्रमुख निर्यात ठिकाणं आहेत. अमेरिकेला भारतातून सर्वाधिक निर्यात होते, हा वाटा ६० टक्के आहे, त्यानंतर युएई आणि चीनला भारतीय इलेक्ट्रॉनिक्सची निर्यात होते.

**<u>जपान</u>**

जपानच्या सत्ताधारी युतीने संसदेच्या वरिष्ठ सभागृहात बहुमत गमावले आहे, परंतु पंतप्रधान शिगेरू इशिबा यांनी आपण राजीनामा देणार नाही असं म्हटलं आहे. लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी आणि त्यांचे भागीदार कोमेइतो यांनी बनवलेल्या युतीला २४८ जागांच्या सभागृहाचे नियंत्रण राखण्यासाठी ५० जागांची आवश्यकता होती परंतु त्यांना फक्त ४७ जागा मिळाल्या, एक जागा अद्याप अनिर्णित आहे. वाढत्या किमती, अमेरिकेच्या करांची भीती आणि राजकीय घोटाळ्यांच्या मालिकेमुळं जपानमधील मतदार निराश आहेत.

**<u>रोझनेफ्ट- युरोपियन युनियन निर्बंध</u>**

रशियन तेल कंपनी रोझनेफ्टनं आपली भारतीय शाखा, नायरा एनर्जीवर युरोपियन संघानं लादलेल्या निर्बंधांना अन्याय्य आणि बेकायदेशीर असल्याचं म्हटलं आहे. युक्रेनमधील युद्धाबद्दल रशियाविरुद्धच्या नवीन उपाययोजनांचा एक भाग म्हणून युरोपियन संघानं शुक्रवारी रोझनेफ्टच्या भारतीय तेल शुद्धीकरण कारखान्यावर निर्बंध लादले आणि तेलाच्या किमतीची मर्यादा कमी केली. कमी केलेल्या तेलाच्या किमतीची मर्यादा म्हणजे रशियाला भारतासारख्या खरेदीदारांना कमी दरानं त्याचं कच्चं तेल विकावं लागेल. रशियन तेलाचा दुसरा सर्वात मोठा खरेदीदार म्हणून, भारताला या निर्णयाचा फायदा होणार आहे.

**<u>अलास्का - भूकंप</u>**

अमेरिकेच्या अलास्का द्वीपकल्पात आज सकाळी ६ पूर्णांक २ रिख्टर क्षमतेचा भूकंप झाला. गेल्या आठवड्यातच अलास्काला ७ पूर्णांक ३ रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला होता. अलिकडच्या

भूकंपानंतर, अलास्काच्या किनारी भागात त्सुनामी येण्याचा इशारा देण्यात आला आहे आणि लोकांना ताबडतोब जमिनीखाली किंवा उंच जमिनीवर जाण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**मुलगी-पुल**

ओडिशामधील बलांगा इथं जाळण्यात आलेल्या १५ वर्षीय मुलीला गंभीर अवस्थेत न्यू दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिला जीवरक्षक यंत्रणेवर ठेवण्यात आले असून डॉक्टरांची विशेष टीम तिच्यावर लक्ष ठेवून आहे.

**बॅडमिंटन-NOA-**

जर्मनीमध्ये बर्लिन इथं सुरू असलेल्या FISU जागतिक विश्वविद्यालय बॅडमिंटन स्पर्धेत पहिलं पदक मिळवून भारतान ऐतिहासिक कामगिरी केली आहे. भारतान मिश्र संघ स्पर्धेत तैवानविरुद्ध उपांत्य फेरीत 3-1 ने उपविजेता ठरत कास्य पदक मिळवल. चार सामन्यांमध्ये, देविका सिहागने महिलांच्या एकेरी सामन्यात हुआंगचिंग पिंगला हरवून भारतासाठी एक गुणमिळवला. दरम्यान, यास्पर्धेत जलतरणपटू श्रीहारी नटराजने पुरुष 100 मीटर फ्रीस्टाइलमध्ये सर्वोत्तम भारतीय वेळेचा विक्रम नोंदवला. नटराजने विरधवल खाडेचा 16 वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला.

**खेळ**

२०२५ च्या FIDE महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत, कोनेरू हम्पीने जॉर्जियातील बटुमी इथं उपांत्य फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला बनून इतिहास रचला. हम्पीनं एका रोमांचक सामन्यात चीनच्या सॉन्ग युक्सिनला पराभूत करून इतिहास रचला आणि स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारी ती पहिली भारतीय बनली.

**कर्नाटक**

मुसळधार पावसामुळे कर्नाटकच्या किनारी भागात सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. गुरुवारी उत्तर बंगालच्या उपसागरात नवीन कमी दाबाचं क्षेत्र तयार होण्याची शक्यता असल्यानं २६ तारखेपर्यंत या भागात मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

केरळच्या अनेक भागात झालेल्या मुसळधार पावसामुळं नद्या आणि धरणांच्या पाण्याची पातळी वाढली आहे, सखल भागात पाणी साचलं आहे. पश्चिम उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्ये उद्यापर्यंत आणि २४ जुलैपर्यंत पंजाब, जम्मू आणि काश्मीरमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज विभागानं वर्तवला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**